# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा.क्र.  503/2022    दिनांक : 30.12.2022

## 1)घरफोडीचा प्रयत्न :–

**1)हदगांव :–** दिनांक 28.12.2022 रोजी 18.30 ते 20.00 वा. चे दरम्यान, **जय केदारनाथ जिनिंग प्रेसिंग फॅक्ट मध्ये वाळकी फाटा हदगाव रोड ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील अल्ताफचा भाऊ व इतर दोन अज्ञात आरोपीतांनी जिनींगचे मेन गेटचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून जिनींग मधील दोन मोटारीचे बोल्ट खोलुन त्यांना बाजुला काढुन पाच ते सहा पाईप खोलुन चोरून नेण्याच्या प्रयत्नात असतांना फिर्यादीचा व इतर लोकांचा आवाज ऐकुण पळुन गेले. वगैरे **फिर्यादी बापुराव अरविंदराव वानखेडे, वय 39 वर्षे, व्यवसाय पेट्रोल पंप चालक रा. ल्हयारी ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरन 365/2022 कलम 457, 380, 511 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो क्रं 8308161089** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 27.12.2022 रोजी 08.30 ते 17.00 वा. चे दरम्यान, **भावसार चौक विठ्ठल मंदीर कमान जवळ मालेगाव रोडवर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पलेंडर प्लस कंपनीची मो सा. क्रं एमएच–26/बीएन–8504 किंमती 50,000/–रुपयाची लॉक करून विठ्ठल मंदीरा जवळ उभा केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयांने सदर मो सा चे लॉक तोडुन चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शेख मुस्तफा शेखमिरा, वय 41 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. हैदरबाग देगलुर नाका नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 488/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2014 सिरसाट, मो. क्रं. 7020510553** हे करीत आहेत.

**2)मनाठा :–** दिनांक 24.11.2022 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **मौ. शिबदरा पाटी मेन रोडचे बाजुस ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पलेंडर प्लस कंपनीची मो सा. क्रं एमएच–26/बीएस–8329 किंमती 25,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयांने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर भारत देशमुख, वय 32 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. शिबदरा ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरन 188/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पवार, मो. क्रं. 9922921694** हे करीत आहेत.

## 3)मंदीरातील चोरी :–

**1)मुदखेड :–**दिनांक 28.12.2022 रोजी 22.00 ते दि. 29.12.2022 चे 06.00 वा. चे दरम्यान, **मौ. रोही पिंपळगाव संगमेश्वर मंदिर ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील रोही पिंपळगाव स्थित संगमेश्वर मंदीरात कुणीतरी अज्ञात चोरटयाने मंदिरातील दानपेटीचे कुलूप तोडुन व त्या पेटीचा पत्रा बाजुला वाकवुन लोकांनी दान केलेली रक्कम च चिल्लर रूपये 25,000/–रूपये चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी उत्तम देवबा कोकणे, वय 50 वर्षे, व्यवसाय पुजारी व शेती रा. रोही पिंपळगाव ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 261/2022 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2232 पवार, मो.क्र. 7776088897** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**1)धर्माबाद :–**दिनांक 24.12.2022 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **धोंडीबा जळबा शिंदे, यांचे शेतात मौ. बाळापुर शेत शिवार ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा धुन्यावरचे गवत कापण्याचे कारणावरून आरोपीतांनी संगणमत करून हातातील कुऱ्हाडीच्या तुंब्याने फिर्यादीच्या डाव्या हाताला जबर मारहाण करून फिर्यादीच्या डाव्या हाताचे हाड मोडुन फॅक्चर केले व फिर्यादी चे मुलास लाथा बुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली आहे. वगैरे **फिर्यादी दत्तु बागन्ना गुगलवाड, वय 55 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. बाळापुर ता. धर्माबाद. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 781/2022 कलम 326, 332, 504, 506, 323, 34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/1928 स्वामी, मो. नं. 9764574333** हे करीत आहेत.

**2)उस्माननगर :**—दिनांक 20.12.2022 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरा समोरून मौ. हाळदा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने त्यांची मो सा वाटेत लावुन धुने धुण्याचा धोंडा काढुन टाकल्याचे कारणावरून नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून कत्तीने फिर्यादीचे आईचे ओठावर मारून गंभीर दुखापत केली. फिर्यादीचे चुलत्यास मुसळाने डाव्या पायास मारून फॅक्चर केले. तसेच फिर्यादीचे वडीलाचे डोक्यात दगड मारून दुखापत केली व पाठीत काठीने मारले व फिर्यादीस दगडाने मारून दुखापत केली. तसेच शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीचे मो सा वर दगड मारून 5000/—रूपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी गजानन किशन कुन्हाडे, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. हाळदा ता. कंधार जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरन 205/2022 कलम 326, 325, 324, 323, 427, 504, 506, 323, 34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोना/127 मुंडे, मो. नं. 9421390003** हे करीत आहेत.

## 5)अपघात :—

**1)इस्लापुर :**— दि.28.12.2022 रोजी चे सायंकाळी 04.30 ते 05.00 वा. चे सुमारास, **नियरा पेट्रोल पंपाजवळ झळकवाडी ते शिवनीकडे जाणारा रोड ता. किनवट जि. नंदेड येथे,** यातील **मयत नामे शंकर नरहरी डोंगरवार, वय 27 वर्षे, व्यवसाय नौकरी पोस्ट मास्टर रा. शिवनी ता. किनवट जि. नांदेड** यातील मो सा क्रं टीएस—16/ईएम—7248 चे चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन नमुद आरोपीने समोरून धडक देवुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी नरेश सुभाषराव डोंगरवार, वय 44 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. कैलासनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं. 120/2022 कलम 279, 337, 338, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बोधगीरे, मो.क्र. 8767824996** हे करीत आहेत.

**2)कंधार :**— दि.28.12.2022 रोजी चे 20.00 ते 21.00 वा. चे दरम्यान, **गांधीनगर ते दिग्रस जाणारे रोडवर वाकाना जवळ मौ. गांधीनगर ता. कंधार जि. नंदेड येथे,** यातील **मयत नामे राजकुमार पि. गोविंदराव टापरे, वय 33 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. रूई ता. कंधार जि. नांदेड** यातील पॅशन प्रो मो सा क्रं एमएच—26/बीएल—3805 चे चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन गाडी स्लीप होवुन खाल पडुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी राजकुमार पि. गोविंदराव टापरे, वय 33 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. रूई ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं. 406/2022 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री इंद्राळे मो.क्र. 9975754256** हे करीत आहेत.

## 6)जुगार :—

**1)कुंटूर :**— दिनांक 29.12.2022 रोजी 16.45 वा. चे सुमारास, **मौ. कहाळा बु. शिवारातील सरकारी बाभळीचे झाडाखाली ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद 16 आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या अंदर बहार नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 12,960/—रुपये व मोटार सायकली असा एकुण 2,07,960/— जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/मोहन सुरेशराव कंधारे, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 194/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री अटकोरे, मो.क्रं. 8669182128** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :—

**बिलोली :**— दिनांक 29.12.2022 रोजी 20.10 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरा समोर अंगणात बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या सिंधी दारू किंमती 1200/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/354, व्यंकट सुभाषराव घोंगडे. ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 246/2022 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2351 मुद्देमवार, मो.नं. 9823802677** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड